# राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

क्रमांक- रानिआ/मनपा/२०११/प्र.क्र. २४/का.५
नवीन प्रशासन भवन, मादाम कामा रोड,
हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई ४०० ०३२
दिनांक - १७/१२/२०११

प्रति,
आयुक्त,
सर्व महानगरपालिका,
सर्व जिल्हाधिकारी.

विषय :- राज्य निवडणूक आयोगाचा लोगो छापणेबाबत.

महोदय,

राज्य निवडणूक आयोगाने अनावरण केलेला बोधचिन्हाचा नमुना सोबत जोडला आहे. निवडणुकीचे नमुने इ. छपाई करतांना सदर बोधचिन्ह कोणत्या नमुन्यांवर छापावे याबाबत सतत विचारणा होत असते. यासंदर्भात खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी :-

१) सदर राजमुद्रा तसेच आयोगाचे बोधचिन्ह व राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र हे शब्द केवळ सर्व प्रकारचे सांविधिक नमुने व निवडून आल्यानंतर उमेदवारास द्यावयाचे प्रमाणपत्र यावरच छापावे. (प्रपत्र-१)

२) इतर नमुन्यांवर तसेच महत्वाच्या सूचनांवर आयोगाचे बोधचिन्ह व राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र हे शब्द एवढाच मजकूर छापावा. (प्रपत्र-२)

३) इतर बाबी उदा. उमेदवार तसेच प्रतिनिधी यांचे बिल्ले, ओळखपत्रे इ. साहित्यावर राजमुद्रा तसेच राज्य निवडणूक आयोगाचे बोधचिन्ह छापल्यास त्याचा गैरवापर होण्याची शक्यता आहे. त्यामुळे याची छपाई इतर कोणत्याही साहित्यावर करण्यात येऊ नये.

मा. राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

आपला,

( ध. मा. कानेड )
अवर सचिव,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

## प्रपत्र - १

राजमुद्रा तसेच आयोगाचे बोधचिन्ह व राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र हे शब्द असलेला नमुना:

**राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र**

---

## प्रपत्र - २

आयोगाचे बोधचिन्ह व राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र हे शब्द असलेला नमुना :

**राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र**